**ठळक बातम्या**

- दिल्लीत लाल किल्ला परिसरात स्फोट घडवून आणणाऱ्या दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असा प्रधानमंत्र्यांचा इशारा /या बॉम्बस्फोट प्रकरणाचा तपास NIA कडे द्यायचा केंद्रीय गृहमंत्रालयाचा निर्णय

- बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी संध्याकाळी पाच वाजेपर्यंत ६७ पूर्णांक १४ शतांश टक्के मतदान

- छत्तीसगढ-महाराष्ट्र सीमेवरच्या जंगलात सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत सहा नक्षलवादी ठार

- सहाव्या राष्ट्रीय जल पुरस्कारांमधे जलसंवर्धन आणि व्यवस्थापनात सर्वोत्तम राज्याचा पुरस्कार महाराष्ट्राला जाहीर

**आणि**

- पहिल्या अंध महिला टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत श्रीलंकेचा १० गडी राखून पराभव करत भारताची विजयी सलामी

**<><><><><>**

दिल्लीत लाल किल्ला परिसरात स्फोट घडवून आणणाऱ्या दोषींवर अत्यंत कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सांगितलं. भूतान इथं एका कार्यक्रमात ते बोलत होते. काल रात्रीपासून स्फोटाचा तपास करणाऱ्या यंत्रणांकडून सातत्यानं माहिती घेत असून या स्फोटामागच्या खऱ्या सुत्रधाराला तपास यंत्रणा शोधून काढतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. संपूर्ण देश स्फोटात मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांसोबत असल्याचं मोदी यांनी सांगितलं.

**- - -होल्ड बाईट मोदी - - -**

लाल किल्ला मेट्रो स्थानकाजवळ एका गाडीत काल संध्याकाळी सातच्या सुमाराला शक्तीशाली स्फोट झाला. त्यात आठ जणांचा मृत्यू झाला तर अनेक जण जखमी झाले.

या प्रकरणाचा तपास NIA, अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेकडे द्यायचा निर्णय केंद्रीय गृहमंत्रालयानं आज घेतला. काल झालेल्या बॉम्बस्फोटाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या निवासस्थानी झालेल्या उच्चस्तरीय सुरक्षा आढावा बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या प्रकरणातला प्रत्येक आरोपी शोधून काढण्याचे निर्देश शहा यांनी दिले.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यातलं मतदान आज झालं. संध्याकाळी पाच वाजेपर्यंत ६७ पूर्णांक १४ शतांश टक्के मतदान झालं. या टप्प्यात १ हजार ३०२ उमेदवारांचं राजकीय भवितव्य मतपेटीत बंद झालं आहे. येत्या १४ तारखेला मतमोजणी होणार आहे.

दरम्यान, सात राज्यांमधल्या ८ विधानसभा मतदारसंघांच्या पोटनिवडणुकीसाठी आज मतदान झालं. जम्मू काश्मीरमधे बडगाम आणि नागरोटा, राजस्थानमधे अंता, झारखंडमध्ये घाटशिला, तेलंगणात ज्युबिली हिल्स, पंजाबमध्ये तरनतारन, मिझोराममध्ये डम्पा आणि ओदिशात नुआपाडा या मतदारसंघांसाठी आज मतदान झालं. मतमोजणी १४ नोव्हेंबर रोजी म्हणजेच बिहार विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणी दिवशीच होणार आहे.

**<><><><><>**

छत्तीसगढ-महाराष्ट्र सीमेवरच्या बस्तर, बिजापूर आणि गडचिरोली जिल्ह्यात असलेल्या जंगलात आज सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांची चकमक झाली. या चकमकीत सहा नक्षलवादी ठार झाल्याची माहिती सुरक्षा दलानं दिली. यावेळी

स्वयंचलित शस्त्र, स्टेनगन, बंदुक, आणि इतर शस्त्र तसंच स्फोटकं चकमकीच्या ठिकाणाहून हस्तगत केल्याचं पोलिसांनी सांगितलं.

<><><><><>

महाराष्ट्रात न्यायालयांचा परिसर, तसंच न्यायाधीशांच्या निवासस्थानांच्या सुरक्षेसाठी अतिरिक्त ८ हजार २८२ सुरक्षारक्षक नियुक्त करायला राज्य मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली. मुंबईत झालेल्या बैठकीत मंत्रिमंडळानं हा निर्णय घेतला. हे सुरक्षारक्षक महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडून उपलब्ध करून घेतले जातील. त्यांच्या वेतनासाठी आवश्यक ४४३ कोटी २४ लाख ८४ हजार ५६० रुपयांच्या तरतुदीला मंत्रिमंडळानं मान्यता दिली.

पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाच्या अहवालाच्या अंमलबजावणीचा कालावधी वाढवायलाही मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली. त्यानुसार अंमलबजावणीचा कालावधी १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ पर्यंत राहणार आहे.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी अँगोलाचा दौरा यशस्वीपणे पूर्ण केला असून त्या आता बोत्स्वानाच्या दौर्यासाठी रवाना होत आहेत. हा भारताच्या राष्ट्रप्रमुखांचा अँगोलाला झालेला पहिलाच दौरा आहे.सागरी मत्स्यव्यवसाय क्षेत्रात सहकार्यासाठी आणि राजकीय कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना रोजगाराची परवानगी देण्यासाठी दोन सामंजस्य करार यावेळी करण्यात आले.

राष्ट्रपती मुर्मू आज रात्री बोत्स्वानात पोहोचतील आणि तेथील राष्ट्रपती डुमा बोकॉ यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करतील. बोत्स्वानाने भारतासोबत चित्ता स्थानांतर प्रकल्पात सहकार्याची तयारी दर्शवली आहे.

<><><><><>

सहावे राष्ट्रीय जल पुरस्कार केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी आज जाहीर केले. जलसंवर्धन आणि व्यवस्थापनात सर्वोत्तम राज्याचा पुरस्कार

महाराष्ट्राला जाहीर झाला आहे. गुजरात आणि हरियाणा अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानावर आहेत. सर्वोत्तम नागरी स्थानिक स्वराज संस्था या श्रेणीत नवी मुंबई महानगरपालिकेला प्रथम क्रमांक मिळाला आहे. सर्वोत्तम पाणी वापरणारी संस्था श्रेणीत  नाशिकच्या कानिफनाथ संस्थेला दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे.

नवी दिल्लीत विज्ञान भवन इथं १८ नोव्हेंबरला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होणार आहे.

**<><><><><>**

पहिल्या अंध महिला टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताने विजयी सलामी दिली आहे. नवी दिल्ली इथे झालेल्या पहिल्या सामन्यात भारताने श्रीलंकेचा १० गडी राखून पराभव केला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेणाऱ्या श्रीलंकेला १३ षटकं आणि ३ चेंडुंमधे फक्त ४१ धावा करता आल्या. भारताने कुशल क्षेत्ररक्षणाच्या बळावर सात गडी धावचीत केले. तर कर्णधार दीपिका टीसी, गंगा कदम आणि जमुना राणी टुडू यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला. श्रीलंकेने दिलेलं ४१ धावांचं आव्हान भारताने फक्त ३ षटकांत पार केलं. कर्णधार दीपिका टीसी हिने सलामीला उतरून दमदार फलंदाजी करत १४ चेंडुंमध्ये चार चौकारांसह २६ धावा केल्या, तर अनेखा देवीने तिला १५ धावा करत साथ दिली. या स्पर्धेत भारतासह श्रीलंका, नेपाळ, पाकिस्तान, अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया हे सहा संघ सहभागी झाले आहेत.

**<><><><><>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात मुलगी जन्माला येताच आधार कार्डासह विविध प्रमाणपत्र देऊन स्वागत करण्याचा उपक्रम महिला आणि बालकल्याण विभागानं हाती घेतला आहे. त्याबाबत आमच्या वार्ताहरानं सांगितलं…

## होल्ड- व्हॉईसकास्ट (२६ सेकंद)

*(जन्माला येणाऱ्या मुलींच स्वागत करताना त्या मुलींचं आधार कार्ड, आभाकार्ड, वय  अधिवास आणि राष्ट्रीयत्वाच प्रमाणपत्र तसंच जात प्रमाणपत्र सुद्धा देण्याची संकल्पना जिल्ह्यात राबवण्यात येणार आहे. जिल्ह्यातल्या प्रत्येक तालुक्यामध्ये तहसीलदारांमार्फत प्रत्येकी १० ते १५ मुलींच वेगवेगळी प्रमाणपत्र देऊन स्वागत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.  अशा प्रकारे १०० मुलींना जन्मताच ही प्रमाणपत्र देऊन त्यांच स्वागत करण्याचा पायलट प्रोजेक्ट राबवला जाणार आहे.)*

**<><><><><>**

राज्यातल्या विविध महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी आज आरक्षण सोडती जाहीर झाल्या.

**बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या** २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी एकसदस्यीय  प्रभाग प्रद्धतीनुसार आरक्षण निश्चिती आणि सोडत आज वांद्रे इथल्या बालगंधर्व रंगमंदिराच्या सभागृहात काढण्यात आली. एकूण २२७ जागांपैकी अनुसूचित जातीसाठी १५, अनुसूचित जमातींसाठी २, तर नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी ६१ जागा राखीव ठेवल्या आहेत. ११४ जागा महिलांसाठी राखीव असून त्यापैकी अनुसूचित जातींसाठी ८, अनुसूचित जमातींसाठी १, तर नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिलांसाठी ३१, आणि ७४ जागा सर्वसाधारण महिलांसाठी राखीव आहेत.

**<><><><><>**

वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी सांगितले की आरोग्यसेवा परवडणारी करणे हे सरकारचे प्राधान्य आहे. नवी दिल्लीतील सीआयआय च्या २२ व्या वार्षिक आरोग्य शिखर परिषदेत ते बोलत होते.

त्यांनी आरोग्य आणि जीवनविम्यावरचा जीएसटी १८ टक्क्यांवरून शून्य टक्क्यांवर आणल्याने नागरिकांना दिलासा मिळाल्याचे सांगितले.

**<><><><><>**

भारत, हरित हायड्रोजन क्षेत्रात उत्पादन, वापर आणि निर्यातीचं केंद्र बनावा असं सरकारचं उद्दिष्ट असल्याचं केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद

जोशी म्हणाले. ते आज नवी दिल्ली इथं झालेल्या तिसर्या आंतरराष्ट्रीय हरित हायड्रोजन परिषदेच्या उद्घाटन सत्रात बोलत होते. हरित हायड्रोजनकडे पर्याय म्हणून नाही तर आर्थिक स्त्रोत म्हणून पाहणं गरजेचं असल्याचंही ते यावेळी म्हणाले. दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेत हरित हायड्रोजन उत्पादनाशी संबंधित विषयांवर आणि विविध क्षेत्रांमधल्या त्याच्या प्रायोगिक वापरावर चर्चा होणार आहे.

//<><><><><>//